डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

ई-निविदा/IBPS/स्पर्धा परीक्षा संस्थांची निवड/२०२२-२३/ दिनांक:१५/१२/२०२२

## निविदा सूचना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या कडून बँक (IBPS), रेल्वे व एल.आय.सी. इत्यादी व तत्सम पदाच्या स्पर्धा परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी या घटकातील युवक व युवतींसाठी अमरावती, महाराष्ट्र येथे निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रशिक्षण संस्थाची निवड (Empanelment) विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून ६ महिने कालावधीचे निवासी प्रशिक्षण (कोचिंग) याप्रमाणे १ वर्ष कालावधीसाठी देण्याचा उपक्रम अशासकीय / खाजगी संस्थामार्फत राबविण्याकरिता दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रीक लिफाफा व व्यापारी लिफाफा) ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| प्रशिक्षण / कोचिंग चा तपशील | निविदा फॉर्म किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|
| मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी या घटकांकरिता महाराष्ट्र राज्यातील अमरावती, महाराष्ट्र येथे निवासी प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थांची निवड (Institute Empanelment) | रु. १५,०००/- | रु. २,२५,०००/- |

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदा व्दारे होणार असून, निविदा सूचना, अटी व शर्ती इ. माहिती https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२) निविदेची फक्त जाहिरात https://barti.in या वेबसाईटवर Tender वर उपलब्ध आहे.
३) निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक १०/०१/२०२३ आहे.
४) निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार महासंचालक, बार्टी पुणे यांनी राखुन ठेवला आहे.

**निबंधक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**प्रशिक्षण संस्था, (बार्टी), पुणे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

ई-निविदा/IBPS/स्पर्धा परीक्षा संस्थांची निवड/२०२२-२३ दिनांक: / /२०२२

## निविदा सूचना

**मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी या घटकांकरिता बँक (IBPS), रेल्वे व एल.आय.सी. इत्यादी व तत्सम पदाच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी महाराष्ट्र राज्यातील अमरावती, महाराष्ट्र येथे निवासी प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थांची निवड (Institute Empanelment)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या कडून बँक (IBPS), रेल्वे व एल.आय.सी. इ. व तत्सम पदांच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी युवक व युवतींसाठी निवासी प्रशिक्षण देण्याकरीता अमरावती, महाराष्ट्र ठिकाणी निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी प्रशिक्षण संस्थाची निवड (Empanelment) विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून ६ महिने कालावधीचे निवासी प्रशिक्षण (कोचिंग) याप्रमाणे १ वर्ष कालावधीसाठी देण्याचा उपक्रम अशासकीय / खाजगी संस्थामार्फत राबविण्याकरिता दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रीक व व्यापारी) ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| प्रशिक्षण / कोचिंग चा तपशील | निविदा फॉर्म किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|
| मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी या घटकांकरिता महाराष्ट्र राज्यातील अमरावती, महाराष्ट्र येथे निवासी प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थांची निवड (Institute Empanelment) | रु. १५,०००/- | रु. २,२५,०००/- |

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदा व्दारे होणार असून, निविदा सूचना, अटी व शर्ती इ. माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
२) निविदा सादर करु इच्छिणाऱ्या पुरवठादाराने https://mahatenders.gov.in येथे नोंदणी करावी.
३) निविदेची फक्त जाहिरात https://barti.in या वेबसाईटवर Tender वर उपलब्ध आहे.
४) निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी व डिजीटल सर्टीफिकेट संदर्भात काही अडचणी असल्यास त्यांनी पुढील नंबरवर संपर्क साधावा. eproc.support@maharashtra.gov.in
५) निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक १०/०१/२०२३ आहे.
६) निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार महासंचालक, बार्टी पुणे यांनी राखुन ठेवला आहे.

**निबंधक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे ४११००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३० फॅक्स :०२०-२६३३ ३५९६
E-mail: dg@barti.in Website: www.barti.in

ई-निविदा/IBPS/स्पर्धा परीक्षा संस्थांची निवड/२०२२-२३ दिनांक: / /२०२२

**मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी या घटकांकरिता बँक (IBPS), रेल्वे व एल.आय.सी. इत्यादी व तत्सम पदांच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी महाराष्ट्र राज्यातील अमरावती, महाराष्ट्र येथे निवासी प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थांची निवड (Institute Empanelment)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या कडून बँक (IBPS), रेल्वे व एल.आय.सी. इत्यादी व तत्सम पदांच्या स्पर्धा परिक्षेची पूर्व तयारीसाठी महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी युवक व युवतींकरिता निवासी प्रशिक्षण संस्थाची निवड (Empanelment) करण्यासाठी विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून ६ महिने कालावधीचे निवासी प्रशिक्षण/कोचिंग याप्रमाणे १ वर्ष कालावधीसाठी देण्याचा उपक्रम अशासकीय / खाजगी संस्थामार्फत राबविण्यात येणार आहे. सदर निवासी प्रशिक्षण/कोचिंग कार्यक्रम अमरावती, महाराष्ट्र येथे राबविण्यासाठी निवासी प्रशिक्षण/कोचिंग देण्यासाठी अशासकीय / खाजगी संस्थाची नोंदणी सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम नुसार पंजीबद्ध व नोंदणीकृत प्रायव्हेट लिमीटेड कंपनी किंवा प्रोप्रायटर फर्म नोंदणीकृत असावे. (संयुक्त भागिदारी नसलेल्या कंपनी/प्रोपराईटर फर्म) पंजीबद्ध व नोंदणीकृत असलेल्या संस्थांची निवड (Empanelment) करण्यासाठी दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रीक व व्यापारी) ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| प्रशिक्षण / कोचिंग चा तपशील | निविदा फॉर्म किंमत | बयाणा रक्कम |
|---|---|---|
| मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी या घटकांकरिता महाराष्ट्र राज्यातील अमरावती, महाराष्ट्र येथे निवासी प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थांची निवड (Institute Empanelment) | रु. १५,०००/- | रु. २,२५,०००/- |

**निविदेचे वेळापत्रक**

| अ.क्र | प्रकल्प स्तरीय स्टेज | दिनांक व वेळ (पासुन) |
|---|---|---|
| १ | निविदा प्रकाशीत करणे | १५/१२/२०२२ वेळ सायं. १८.५५ |
| २ | निविदा डाऊनलोड करणे सुरु दिनांक | १५/१२/२०२२ वेळ सायं. १८.५५ |
| ३. | निविदा डाऊनलोड करण्याचा अंतिम दिनांक | १०/०१/२०२३ वेळ दु. १२.०० |
| ४. | निविदा पुर्व बैठक दिनांक | २७/१२/२०२२ वेळ दु १२.०० |
| ५. | तांत्रिक लिफाफा सादर करणे सुरु दिनांक | १५/१२/२०२२ वेळ सायं. १८.५५ |
| ६. | तांत्रिक लिफाफा सादर करणे अंतिम दिनांक | १०/०१/२०२३ वेळ दु. १२.०० |
| ७. | तांत्रीक लिफाफा उघडणे दिनांक | ११/०१/२०२३ वेळ दु. १२:०० |

१) संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे होणार असून, निविदा सूचना, अटी व शर्ती इ. माहिती https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२) निविदेची फक्त जाहिरात https://barti.in या वेबसाईटवर Tender वर उपलब्ध आहे.

३) निविदा सादर करु इच्छिणाऱ्या पुरवठादाराने https://mahatenders.gov.in,येथे नोंदणी करावी.

४) निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी व डिजीटल सर्टीफिकेट संदर्भात काही अडचणी असल्यास त्यांनी पुढील नंबरवर संपर्क साधावा ०१२०-४००१ ००२, ०१२०-४००१ ००५, ०१२०-६२७७ ७८७ Email: eproc.support@maharashtra.gov.in

५) इच्छुक निविदाधारकाने निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

६) निविदाधारकाने निविदा भरते वेळी निविदा फी व बयाना रक्कम भरणे आवश्यक आहे.

७) सदर निविदा मंजुर करणे, निविदा उघडण्याचा दिनांक पुढे ढकलणे तसेच निविदा प्रक्रियेत बदल करणे अथवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करणे इत्यादी बाबतचे संपुर्ण हक्क व निर्णय **महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे** यांना राहतील.

८) इंटरनेट, विद्युत पुरवठा, संगणक बिघाड अथवा इतर कारणामुळे निविदा सादर करण्यास विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित पुरवठादार संस्था /कंत्राटदार यांची राहिल. सदर जबाबदारी बार्टी संस्थेवर राहणार नाही.

९) निविदेसोबत अपलोड केलेल्या कागदपत्रांची तपासणी मुळ कागदपत्रांवरुन तांत्रिक लिफाफा उघडते वेळी करण्यात येईल.

१०) तांत्रिक लिफाफा वेळापत्रकानुसार बार्टी कार्यालयात उघडण्यात येईल. त्यात काही बदल झाल्यास बार्टी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल / सुचना फलकावर लावण्यात येईल.

११) निविदा कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार महासंचालक, बार्टी पुणे यांनी राखुन ठेवला आहे.

**निबंधक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**

**निविदेच्या अटी व शर्ती**

**१)** निविदा, निविदेच्या सूचना, अटी, शर्ती व शुध्दीपत्रक https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि. १५/१२/२०२२ वेळ सायं. १८.५५ ते दि. १०/०१/२०२३ वेळ दु. १२.०० या कालावधीत उपलब्ध राहतील.

**२)** ई-निविदा सादर करण्याचा दि. १५/१२/२०२२ वेळ सायं. १८.५५ ते दि. १०/०१/२०२३ वेळ दु. १२.०० वाजेपर्यंत राहिल.

**३)** निविदाधारकाने निविदा भरतेवेळी निविदा फी व बयाना रक्कम भरणे आवश्यक आहे.

**४)** ई-निविदा भरतेवेळी जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ई-निविदा शुल्क रुपये १५,०००/- व बयाणा रक्कम रु. २, २५,०००/- क्रेडीटकार्ड/डेबीटकार्ड/नेटबँकींग/आर.टी.जीएस (R.T.G.S) / एन.ई.एफ.टी (NEFT) च्या व्दारे ऑनलाईन पद्धतीने भरणे अनिवार्य आहे.

**५)** ई-निविदा दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रीक व व्यापारी) सादर करावयाचे आहे.

**६)** Minimum Success Rate (MSR): आवेदनकर्त्या संस्थेने जर ही निविदा प्रसिध्द होण्यापूर्वी बार्टीमार्फत प्रायोजित कोणत्याही स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाचा कार्यक्रम/ योजना राबविली असेल तर त्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा Minimum Success Rate (MSR) कमीत कमी १०% असणे बंधनकारक आहे. अन्यथा सदर संस्थेचे आवेदन ग्राह्य धरले जाणार नाही. जर आवेदन कर्त्या संस्थेने एकापेक्षा अधिक वर्गासाठी किंवा कालावधीसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविला असेल तर MSR सरासरी १०% असावा.

**MSR संबंधी संस्थेने पुढील कागदपत्रे सोबत जोडावीत**

१. कार्यारंभ आदेश
२. प्रशिक्षणार्थींचे प्रायोजित स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रमात प्रवेश घेतलेले पुरावे, यादी (वर्षनिहाय/ कालावधीनिहाय)
३. प्रशिक्षणार्थींनी ज्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा लाभ घेतलेला आहे त्या परिक्षेतील अंतिम निवड यादीतील नाव, निकाल व इतर आवश्यक कागदपत्रे.

**७)** संस्थेचे / फर्मचे नाव काळ्या यादीत नाही. तसेच संबंधीत संस्थेच्या कोणत्याही नातेवाईकास काम देण्यात येणार नाही त्याबाबतचे हमीपत्र जोडावे.

**८) तांत्रिक लिफाफ्यासाठी अनिवार्य कागदपत्रे पुढीलप्रमाणे:-**

१) निविदा फॉर्म- अ
२) निविदा फी व बयाणा रक्कमेचा भरणा केल्याची संगणकीकृत पावती.
३) प्रशिक्षण संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम नुसार पंजिबद्ध /प्रायव्हेट
   a) लिमीटेड कंपनी किंवा प्रोप्रायटर फर्म नोंदणीकृत (संयुक्त भागिदारी नसलेल्या कंपनी/प्रोपराईटर फर्म) असलेले नोंदणी प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे.
४) संस्थेचा पॅन क्रमांक व GST नोंदणी क्रमांक आवश्यक आहे. (छायांकित प्रती आवश्यक)
५) संस्थेने मागील एक वर्षाचे आयकर भरणा केल्याबाबतचे आयकर विवरणपत्र सादर करावे
६) संस्थेच्या नावे रु.५, ००,०००/- (रक्कम रु. पाच लाख) एवढ्या रक्कमेचे राष्ट्रीयकृत बँकेचे हैसियत प्रमाणपत्र (Bank Solvency Certificate) (निविदा प्रसिध्द झाल्यानंतरचे सादर करणे आवश्यक आहे)
७) **"परिशिष्ट ब"** मध्ये निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे स्वाक्षरी आणि पंजिबद्ध हमीपत्र सोबत जोडावे.

८) प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षणासाठी असणारी जागा स्वत:च्या मालकीची / भाडयाची असणे बंधनकारक राहिल. जागा स्वत:च्या/संस्थेच्या मालकीची असेल तर मालमत्ता कर पावती व भाडे तत्वावर असेल तर भाडेकरार नोंदणीकृत केलेला असावा. त्याची प्रत ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक आहे.

९) प्रशिक्षण संस्थेकडे आवश्यक प्रमाणात अंशकालिन अनुभवी तज्ञ प्रशिक्षक वर्ग असणे आवश्यक आहे. प्रशिक्षकांना देय वेतन पगार पत्रक, ऑफर लेटर इ. कागदपत्रे सोबत जोडावे.

१०) प्रशिक्षण संस्थेचा अनुभव तसेच संस्थेत प्रशिक्षण देणाऱ्या शिक्षकांची/ व्याख्यातांची शैक्षणिक अर्हता व अनुभव इ. बायोडेटा व प्रमाणपत्रांच्या प्रतीसह खालील **"परिशिष्ट क"** मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

११) प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षणासाठी वर्ग/खोल्या, (विद्यार्थ्यांसाठी बसण्याची व्यवस्था फर्निचरसह), प्रशिक्षण साहित्य, दुरध्वनी, इंटरनेट सुविधा, वाय-फाय सुविधा, ग्रंथालय, वाचनालय, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, विजेची सोय व प्रशिक्षण केंद्रामध्ये पुरेशी हवा येण्यासाठी इमारीला दारे-खिडक्या आणि बार्टीमार्फत वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे स्वत:च्या मालकीचे / भाडयाच्या इमारतीमध्ये असणे आवश्यक आहे. संबंधीत कागदपत्रे सोबत जोडावीत.

१२) प्रशिक्षण संस्थेकडे प्रशिक्षणार्थी करिता सोयी सुविधेसह निवासाची सोय असणे अनिवार्य आहे. वसतिगृहामध्ये (मुला मुलीचे) पुरेशा खोल्या पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह, विजेची सोय, भोजनकक्ष इत्यादी सोयी असणे आवश्यक आहे. संबंधीत कागदपत्रे सोबत जोडावीत.

१३) कोचिंगमध्ये समाविष्ट करावयाचे विषय:- (Syllabus)

**पूर्व परीक्षा**

| Sr. No. | Subjects |
|---|---|
| १. | English Language |
| २. | Quantitative Aptitude |
| ३. | Reasoning Ability |

**मुख्य परीक्षा**

| Sr. No. | Subjects |
|---|---|
| १. | Reasoning and Computer Aptitude |
| २. | General/Economy/Banking Awareness |
| ३. | English/Language |
| ४. | Data analysis and interpretation |
| ५. | English Language ( Letter writing and Essay) |

**व मुलाखत तसेच गट चर्चा याची तयारी करून घेणे.**

१३) स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविलेल्या किंवा इतर तत्सम बँक (IBPS),रेल्वे, एल.आय.सी. व इतर तत्सम स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाच्या कामाचा ३ वर्ष पूर्व अनुभव असणे आवश्यक आहे. प्रशिक्षण घेवून शासकीय सेवेत किंवा बँक (IBPS), रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी संस्थांमध्ये निवड झालेल्या उमेदवारांची निवड यादी पुराव्यासह **"परिशिष्ट ड"** मध्ये निविदेसोबत जोडणे बंधनकारक राहिल.

**९) अ) बार्टी मार्फत सनियंत्रण-**

१) प्रशिक्षण कालावधीत मा. महासंचालक, बार्टी, पुणे यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी अथवा कर्मचारी यांना अचानक संस्थेला भेट देवून पहाणी करण्याबाबतचे अधिकार राहतील.

२) संस्थेतील प्रवेशीत प्रशिक्षणार्थीची नोकरीच्या संधीचे प्रमाण / निकाल पाहून त्यांना पुढील बॅचचे कामकाज सोपविण्यात येईल.

३) संस्थेचे कामकाज समाधान कारक नसल्याचे आढळल्यास पुढील बॅचचा कालावधी वाढविणे/ कमी करणे/ नाकारणे या बाबतचे पूर्ण अधिकार महासंचालक बार्टी यांचेकडे राहतील. याबाबत महासंचालक यांचा निर्णय अंतिम राहील.

४) प्रशिक्षण केंद्र चालक संस्थेने दररोज विद्यार्थ्यांची/व्याख्याते यांची उपस्थिती बायोमॅट्रीक मशिनवर नोंद ठेवणे आवश्यक आहे. (बार्टी मार्फत वेळोवेळी देण्यात येतील त्या सुचनानूसार)

५) नोंदणी व निवड केलेल्या संस्थेस डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी निर्देशित व सुचित केल्यानुसार लेखी करार करावा लागेल.

६) ई-निविदा मंजूर झाल्यास महाराष्ट्र शासनाच्या स्टँम्प ड्युटी अॅक्ट प्रमाणे देय असलेले मुद्रांक शुल्क भरुन करारनामा करुन द्यावा लागेल.

७) ई-निविदा मंजूर झाल्यास संस्थेस नियमानुसार एकूण निविदा रकमेच्या (३%) देय असलेले सुरक्षा ठेव (Security Deposit) रक्कम स्वीकृती पत्र (Letter of Intent) मिळाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत आवर्ती ठेव जमा (Fixed Deposit Receipt) किंवा बँक गॅरंटीच्या स्वरुपात जमा करणे बंधनकारक राहील. सदर ठेव महासंचालक, **डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे** यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेत ठेवणे बंधनकारक राहील. सुरक्षा ठेव प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर शासकीय लेखापरीक्षण अहवाल प्राप्तीनंतर परत करण्यात येईल.

८) निविदापुर्व बैठक (प्रिबिड मिंटींग) दिनांक २२/१२/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे २८ राणीचा बाग, जुन्या सर्किट हाऊस जवळ, कॅम्प, पुणे या कार्यालयात घेण्यात येईल.

९) ६ महिन्यांच्या कालावधीमध्ये प्रशिक्षण केंद्रावर १५० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे बंधनकारक राहिल.

**ब) अर्जाचा नमुना:-**

१) प्रशिक्षण देणाऱ्या तज्ञ व्यक्तींची / व्याख्याते यांची यादी बायोडेटा, मागील ३ महिन्यांचे पगारपत्रक व इतर आवश्यक कागदपत्रांसह अर्जासोबत जोडावी लागेल.

२) प्रशिक्षण केंद्र जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सुरु करावयाचे आहे. मुख्यालयाचे नाव ठिकाण संस्थेने निवेदेमध्ये स्पष्टपणे नमुद करणे आवश्यक आहे.

३) प्रशिक्षण केंद्र चालु करण्याकरिता उपलब्ध वर्ग खोल्यांची संख्या, त्यांचा आकार मंजुर नकाशा व इतर आवश्यक माहिती अर्ज निविदे सोबत जोडावे लागेल. (कमीत- कमी १५०० चौ. फुट जागा असणे आवश्यक आहे.)

४) निविदाधारकाने त्यांचा अर्ज **''निविदा फॉर्म- अ''** व त्यासोबत मागणी केलेली प्रमाणपत्रे / कागदपत्रे जोडावीत.

५) निविदा स्वीकारण्याचे, उघडण्याच्या तारखेमध्ये व वेळेमध्ये बदल करण्याचे तसेच संस्थेची निविदा कोणतेही कारण न दाखविता अंशत: किंवा पूर्णत: मंजूर करण्याचे अधिकार किंवा नामंजूर करण्याचे अधिकार महासंचालक, बार्टी यांनी राखून ठेवले आहेत.

६) अर्जातील प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक आहे.

७) या संस्थेतर्फे प्रशिक्षण केंद्रास आदेश देण्यापूर्वी महासंचालक, बार्टी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी संबंधित संस्थेस भेट देऊन त्यांनी अर्जामध्ये नमुद केलेली माहिती बरोबर व वस्तुनिष्ठ असल्याची खात्री करतील आणि त्यांचा अहवाल समाधानकारक आल्यानंतरच व इतर बाबी योग्य असल्यास संस्थेची नोंदणी केली जाईल.

**<u>क) प्रशिक्षण (Coaching) बाबत संक्षिप्त माहिती:-</u>**

- **सदर निवासी प्रशिक्षण/कोचिंग कार्यक्रम महाराष्ट्र राज्यातील अमरावती, महाराष्ट्र ठिकाणी असेल.**

१) प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी १ वर्षाचा असेल, प्रत्येक केंद्रामध्ये १२ वी उत्तीर्ण व पदवी अहर्ता असलेल्या १५० विद्यार्थ्यांना एका केंद्रामध्ये ६ महिन्यांसाठी प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील. साधारणत: ५० विद्यार्थ्यांची एक वर्ग याप्रमाणे तीन वर्ग मध्ये प्रशिक्षण देणे बंधनकारक असेल. प्रशिक्षणार्थींना परिक्षेच्या अनुषंगाने प्रशिक्षण द्यावे लागेल किंवा महासंचालक, बार्टी यांनी निर्धारित इतक्या उमेदवारांसाठी प्रशिक्षणाचे वर्ग व विद्यार्थी संख्या तथा प्रशिक्षण कालावधी वाढविण्याचे किंवा कमी करण्याचे अधिकार महासंचालक यांना राहतील.

२) एका बॅचचा प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिन्यांचा असेल.

३) उपरोक्त परिच्छेदात [ब-२] नमुद केल्याप्रमाणे जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात येईल.

४) संस्थेचे मागील तीन वर्षाचे झालेले लेखापरिक्षण व सदर लेखा परिक्षण अहवालात गंभीर स्वरुपाचे आक्षेप नसावेत. असे गंभीर स्वरूपाचे आक्षेप असल्यास सदर संस्थेचे आवेदन ग्राह्य धरले जाणार नाही. (अर्जासोबत अहवाल जोडणे आवश्यक आहे.)

५) बँक, रेल्वे, एल.आय.सी इत्यादी स्पर्धा परिक्षांकरिता पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागवुन त्यांची सामाईक प्रवेश परिक्षा घेऊन पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार व विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार बार्टी, पुणे निवड करील. निवड प्रक्रियेमध्ये संस्थेचा सहभाग असेल. परिक्षेच्या सर्व प्रक्रियेसाठी येणारा खर्च संस्थेने करणे बंधनकारक आहे.

६) या संस्थेचे महासंचालक किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी वेळोवेळी पाहणी करतील व त्याबाबतचा अहवाल महासंचालक, बार्टी, पुणे यांना सादर करतील.

७) संस्थेच्या कामावर सनियंत्रण ठेवणे, मुल्यमापन करणे व लेखापरिक्षणा बाबतची कार्यवाही करणे इ.बाबींचे अधिकार महासंचालक, बार्टी, पुणे यांचेकडे राहतील.

८) निविदाधारक संस्थेच्या अध्ययन केंद्रामध्ये काही अडचणी निर्माण झाल्यास, संस्था अयोग्य आहे असे आढळल्यास संस्थेचे प्रशिक्षण केंद्र बंद करण्याचा अधिकार महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेने राखुन ठेवला आहे.

९) **उमेदवारांची निवड खालील निकषांच्या आधारे केली जाईल.**

- सदरील प्रशिक्षण हे महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी विद्यार्थ्यांना देण्यात येईल.
- ३०% जागा अनुसूचित जातीच्या महिला उमेदवारासाठी राखीव असतील.
- शासकिय धोरणाप्रमाणे ४% जागा अनुसूचित जातीच्या दिव्यांग असलेल्या व्यक्ती (Person with Disability) साठी राखीव राहील.
- ५% जागा वंचित घटकांकरिता (उदा. वाल्मिकी, मेहतर व इतर वंचित घटकांसाठी ) राखीव राहतील.
- मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी या घटकांकरिता निवासी प्रशिक्षण देण्याकरीता महाराष्ट्र राज्यातील अमरावती, महाराष्ट्र ठिकाणी प्रशिक्षण संस्थांची निवड (Institute Empanelment), बँक (IBPS), रेल्वे, एल.आय.सी इ. पदाच्या सेवाभरतीसाठी निवड मंडळामार्फत तसेच राज्य, केंद्रशासनाने आयोजित करण्यात येणाऱ्या परिक्षांसाठी विहित केलेल्या इतर सर्व अर्हता उमेदवारांकडे असणे अनिवार्य आहे.

- या प्रशिक्षणाचा लाभ फक्त प्रशिक्षण कालावधी संपेपर्यंतच असेल.

**ड) बँक, रेल्वे, एलआयसी स्पर्धापरीक्षा (आयबीपीएस) निवासी कोंचिग बाबत तांत्रिक तपशील पुढील कागदपत्रांच्या आधारे गुणांकन करण्यात येईल :-**

**(एकुण गुण संख्या -१००)**

| अ.क्र | प्रशिक्षणाचा निकष | पुरक कागदपत्रे | निकषा बाबतचे वर्णन व गुण | कमाल गुण |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशिक्षण संस्थेच्या बॅक, रेल्वे , एल.आय.सी., इत्यादी प्रशिक्षणामधील यशस्वी विद्यार्थ्यांचे निकाल | बँक (IBPS), रेल्वे, एल.आय.सी इ. व तत्सम पदाच्या सेवा भरतीसाठी मागील पाच वर्षात नोकरीची संधी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांची यादी.<br>तसेच सदर संस्थेमध्ये प्रशिक्षण घेतल्याबाबतचे पुरावे (उदा. प्रवेश अर्ज /उपस्थिती रजिस्टर मधील नोंदी अभिलेखे, प्रशिक्षणाचा कालावधी परिशिष्ट-२ सोबत जोडलेले प्रपत्रानुसार यशस्वी विद्यार्थी यांची माहिती द्यावी. उदा.संबंधीत आस्थापना निवड यादी प्रत,(नियुक्ती पत्र, उत्तीर्ण उमेदवाराचा अभिप्राय) | बँक (IBPS), रेल्वे, एल.आय.सी इ. व तत्सम पदाच्या सेवा भरतीसाठी मागील पाच वर्षात नोकरीची संधी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांची<br>कमीत कमी २० विद्यार्थी **५ गुण**<br>२१ विद्यार्थी ते ५० विद्यार्थी **१० गुण**<br>५० पेक्षा जास्त विद्यार्थी **कमाल १५ गुण** | १५ |
| २ | स्पर्धा परिक्षा करीता उपलब्ध असणारे अद्ययावत पुस्तक संच संख्या | सदर प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमावर आधारित विषयवार अद्ययावत पुस्तक संच/ स्पर्धा परिक्षा अभ्यास साहित्य /स्पर्धा परिक्षा अभ्यासाकरीता प्रशिक्षणार्थ्यांना पुरवठा केलेल्या पुस्तकांचा साठा. (सोबत स्वतंत्र पुस्तक यादी जोडणे आवश्यक) | अद्ययावत पुस्तक संच संख्या कमीत कमी ५० - **०२ गुण**<br>अद्ययावत पुस्तक संच संख्या कमीत कमी ५० ते १०० - **०३ गुण**<br>अद्ययावत पुस्तक संच संख्या १०० पेक्षा जास्त- **कमाल ०५ गुण** | ०५ |
| ३ | स्पर्धा परिक्षा प्रशिक्षणासाठी आवश्यक इमारत व मुलभुत सोयीसुविधा | • उपयोगात असलेल्या इमारतीचा मंजूर नकाशा. (मोजमापसह) छायाचित्रे (Photographs) मालकी दर्शविणारे कागदपत्रे (Index-२)/ करारनामे<br>• आवश्यक किमान १५०० Sq.Ft. क्षेत्रफळ आवश्यक | १५०० Sq. Ft. ते २००० क्षेत्रफळ **५ गुण**<br>२००१ Sq.Ft. ते २५०० क्षेत्रफळ **१० गुण**<br>२५०० पेक्षा जास्त क्षेत्रफळ **१५ गुण** | |
| | | **इमारत**<br>• इमारत व वर्ग खोल्या<br>• अद्यायावत सुविधांनी युक्त प्रशिक्षण हॉल (प्रोजेक्टर,डिजिटल ईटरॅक्टीव्ह बोर्ड इ.) | संस्थेचे वेबसाईट - **०२ गुण**<br>Wifi सुविधायुक्त प्रशिक्षण हॉल **०१ गुण** | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | • ग्रंथालय (पुस्तके, वृत्तपत्रे, मासिके यांचे पुरावे)<br>• अभ्यासिका (बैठक व्यवस्था, वातानुकुलित)<br>• कार्यालय<br>• स्वतंत्र स्वच्छता गृह (महिला व पुरुष) Washroom, Urinal Toilet, Wash Besin पुरेशा पाण्याच्या व्यवस्थेसह.<br>• **मुलभुत सोयीसुविधा**<br>• फर्निचर (अभ्यागतांना बसण्यास बैठक व्यवस्था इ.) इतर सोईसुविधा (शुध्द पिण्याचे पाणी, किमान २६० लिटर क्षमता फिल्टरसह इ.)<br>• आधार संलग्न बायोमेट्रीक सुविधा<br>• पुरेसे इनर्व्हटर बॅकअप<br>• संगणक लॅब, इंटरनेट व वाय-फाय सुविधा किमान २० बैठक व्यवस्था.<br>• सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बंधनकारक (संपूर्ण प्रशिक्षण केंद्राचा परिसर वर्ग खोल्यासह)<br>• झेरॉक्स मशिन सुविधा.(अद्ययावत)<br>• अग्निशामक यंत्रणा<br>• मासिके तथा वृत्तपत्रे विकत घेतले बाबतचा पुरावा जोडावा.<br>**बैठक व्यवस्था**<br>बैठक व्यवस्था वर्ग खोली निहाय (एकुण बैठक व्यवस्था १५० पेक्षा अधिक असावी. प्रति वर्ग बैठक व्यवस्था नमुद असावी. | स्पर्धा परीक्षा ग्रंथालय पुस्तक संच<br>स्वतंत्र ग्रंथालय, किमान पुस्तक संख्या सह १०० पुस्तके - **०२ गुण.**<br><br>१०० पेक्षा जास्त पुस्तके,<br>किमान ५ वृत्तपत्रे प्रत्येकी ५ संच (२ राष्ट्रीय, १ इंग्रजी, २ राज्यस्तरीय.)<br>स्पर्धा परीक्षांचे नामांकित किमान ५ मासिके प्रत्येकी ५ संच –<br>**कमाल ०३ गुण**<br><br>**स्वतंत्र अभ्यासिका**<br>किमान ५० विद्यार्थी क्षमतेची वातानुकुलीत बैठक व्यवस्था - **०१ गुण**<br><br>५० पेक्षा अधिक विद्यार्थी क्षमतेची वातानुकुलीत बैठक व्यवस्था –<br>**कमाल ०३ गुण**<br><br>स्वतंत्र कार्यालय – **१ गुण**<br><br>सी.सी.टी.व्ही. यंत्रणा – **१ गुण**<br><br>बायोमेट्रीक हजेरी सुविधा -**१ गुण** | **२७** |
| **४** | निवास व्यवस्थेसाठी आवश्यक मुलभूत सोयीसुविधा | • वसतीगृह (मुले व मुली) असलेल्या इमारतीचा मंजूर नकाशा. (मोजमापसह) छायाचित्रे (Photographs)<br>मालकी दर्शविणारे कागदपत्रे (Index-२)/ करारनामे<br>• सर्व सुविधांनी युक्त, हवेशीर दारे खिडक्या असलेली मुला मुलींसाठी | **वसतिगृह (निवास) मुले व मुलीकरिता स्वतंत्र वसतिगृह असणे आवश्यक**<br><br>वस्तीगृहामध्ये सर्व सुविधांनी युक्त कमीत कमी ५० विद्यार्थ्यांची राहण्याची व भोजनासहित सोय असल्यास –<br>**५ गुण**<br><br>वस्तीगृहामध्ये सर्व सुविधांनी युक्त कमीत | **१५** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | स्वतंत्र निवास व्यवस्था (स्वतंत्र स्वच्छता गृह)<br>• स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा<br>• सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बंधनकारक<br>• निवास खोलीतील प्रत्येकाला वेगळे कपाट<br>• निवास खोलीत स्टडी टेबलची व्यवस्था<br>• स्वच्छ स्वयंपाकगृह व स्वतंत्र भोजनगृहामध्ये भोजन व चहा-नाश्ताची व्यवस्था | कमी १०० विद्यार्थ्यांची राहण्याची व भोजनासहित सोय असल्यास – **७ गुण**<br><br>वस्तीगृहामध्ये सर्व सुविधांनी युक्त कमीत कमी १५० विद्यार्थ्यांची राहण्याची व भोजनासहित सोय असल्यास – **कमाल १० गुण** | |
| | | | वसतिगृहात CCTV यंत्रणा = **२ गुण** | |
| | | | वसतिगृहात अग्निशामक यंत्रणा=**१ गुण** | |
| | | | गृहपाल व सुरक्षारक्षक = **२ गुण** | |
| ५ | तज्ञ व्याख्याते/प्रशिक्षक | • तज्ञ व्याख्यात्यांची विषयनिहाय यादी,यापुर्वी प्रशिक्षणाकरीता संस्थेकडे उपलब्ध असणारे तज्ञ व्याख्याते/प्रशिक्षक त्यांचे करारानामे/वर्कऑर्डर /पगार पत्रक / मानधन पत्र<br>• सद्या उपलब्ध असणारे विषयवार तज्ञ व्याख्याते यांची शैक्षणिक पात्रता व अनुभव | **प्रशिक्षकांची संख्या व गुण**<br>कमीत कमी ०५ व्याख्याते/ तज्ञ मार्गदर्शक/ प्रशिक्षक - **०४ गुण**<br><br>कमीत कमी ८ तज्ञ मार्गदर्शक/प्रशिक्षक – **०६ गुण** | **०६** |
| | | | **अनुभव**<br>कमीत कमी ५ व्याख्यात्यांना ५ वर्षा पेक्षा जास्त शिकवण्याचा अनुभव असल्यास - **३ गुण**<br><br>कमीत कमी ५ व्याख्यात्यांना ७ वर्षा पेक्षा जास्त शिकवण्याचा अनुभव असल्यास - **५ गुण**<br><br>कमीत कमी ५ व्याख्यात्यांना १० वर्षापेक्षा जास्त शिकवण्याचा अनुभव असल्यास - **८ गुण** | **०८** |
| ६ | प्रशिक्षण संस्थेची आर्थिक सक्षमता | मागील ३ वर्षातील (कोविड काळ आर्थिक वर्ष सन २०२०-२१ व २०२१-२२ वगळून) आर्थिक वर्ष २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२०२० चे लेखापरीक्षण अहवाल | **वार्षिक उलाढाल**<br>२५ लाख ते ५० लाख– **०१ गुण**<br>५१ लाख ते ७५ लाख – **०२ गुण**<br>७५ लाख पेक्षा अधिक –**कमाल ०३ गुण** | ०३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सादर करावे. | | |
| ७ | स्पर्धा परीक्षा क्षेत्रात प्रशिक्षणाचा शासना सोबतचा कामाचा अनुभव | शासकीय यंत्रणा/ विभाग यांचेसोबतचे कार्यारंभ आदेश/सामजंस्य करार | ०१ ते ०३ कार्यारंभ आदेश/ सामजंस्य करार – **३ गुण**<br><br>०३ पेक्षा अधिक कार्यारंभ आदेश/ सामजंस्य करार – **कमाल ५ गुण** | **०५** |
| ८ | ऑनलाईन प्रशिक्षण सुविधा | • संस्थेचे स्वत:चे स्वंतत्र मोबाईल ॲप<br>• संगणक प्रयोगशाळा, ऑनलाईन टेस्ट सिरिज, विदयुत बॅकअप सह. | संस्थेचे स्वत:चे स्वंतत्र Android आणि IOS मोबाईल ॲप (संबंधित प्रशिक्षण सुविधांसह) – **०२ गुण** | **१२** |
| | | | Online प्रशिक्षण देण्याचे संसाधने परिपूर्ण सुविधांसह Digital Studio - **०२ गुण** | |
| | | | संगणक लॅब विदयुत बॅकअप सह<br>१५ संगणक असल्यास - **३ गुण**<br>२० संगणक असल्यास -**४ गुण**<br>२० पेक्षा जास्त संगणक असल्यास<br>**५ गुण** | |
| | | | ऑनलाईन टेस्ट सिरिज - **०३ गुण** | |
| ९ | अनुसूचित जातीतील संस्था | • सभासदांचे जातीचे दाखले<br>• संस्था नोदणी कागदपत्रे | अनुसूचित जातीतील संस्था असल्यास – **४ गुण** | **०४** |
| **एकूण** | | | | **१००** |

**A.** तांत्रिक गुणांकन/ मुल्यांकन निकषांमध्ये किमान पात्रतेकरीता ७० गुण (म्हणजे ७०%) आवश्यक आहेत. किमान ७० गुण (७०%) मिळवणारे निविदाधारक हे संस्थेची प्रत्यक्ष तपासणी व व्यापारी लिफाफ्यासाठी पात्र असतील. निविदाधारकांचे **एकूण तांत्रिक गुणांकन /मूल्यांकन ७०% पेक्षा** कमी असल्यास असे निविदा धारक संस्थेची पुढील प्रत्यक्ष तपासणी व व्यापारी लिफाफ्यासाठी अपात्र असतील.

## तांत्रिक गुणांकन (X)

जास्तीत जास्त गुण मिळविणाऱ्या निविदाधारकाला तांत्रिक गुणांकन १०० दिले जाईल. निविदेसाठी इतर निविदाधारकांच्या तांत्रिक गुणांकनाची खालीलप्रमाणे गणना केली जाईल.

$$\text{'प्रकल्पासाठी निविदाधारकांचे तांत्रिक गुणांकन (X)} = १०० \times \frac{\text{संबंधित निविदाधारकास मिळालेले गुण}}{\text{सर्वोच्च गुण प्राप्त झालेला निविदाधारकाचे गुण}}$$

वरीलप्रमाणे तांत्रिक बिडच्या मूल्यमापनावर आधारित गुणांकन निश्चित केला जाईल आणि मूल्यमापनासाठी विचारात घेतलेल्या निविदेसाठी निविदाधारकाचा तांत्रिक गुणांकन (X) असेल.

**B. व्यावसायिक लिफाफ्याचे मूल्यमापन**

मा. महासंचालक, बार्टी यांनी स्थापन केलेली मूल्यमापन समिती व वर म्हटल्याप्रमाणे तांत्रिक लिफाफ्यामध्ये किमान ७० गुण (म्हणजे ७०%) मिळवणाऱ्या निविदाधारकांच्या व्यावसायिक लिफाफ्याचे मूल्यमापन करेल आणि त्याची शिफारस महासंचालक, बार्टी यांच्या निर्णयाकडे सादर करेल. मा.महासंचालक, बार्टी यांचा निर्णय अंतिम असेल तसेच सर्व निविदाधारकांना बंधनकारक असेल.

**आर्थिक गुणांकन: (Y)**

परिशिष्ट 'इ' मध्ये प्रदान केलेल्या नमुन्यानुसार निविदाधाकांनी त्यांची व्यावसायिक लिफाफा सादर करावी. व्यावसायिक लिफाफ्याचे मूल्यमापन निविदाधारकाने सादर केलेल्या एकूण खर्चाच्या (कोचिंग फी) आधारावर केले जाईल. सर्वात कमी किंमत नमूद करणाऱ्या निविदाधारकास १०० चा आर्थिक गुणांकन दिले जाईल.
अक्षरी रक्कम व अंकात नोंद केलेल्या रक्कमेत तफावत असल्यास, अक्षरी नमूद केलेली रक्कम विचारात घेतली जाईल. इतर कोणत्याही गणना/आकडेमोड त्रुटी इत्यादीसाठी बोली नाकारली जाऊ शकते. ज्या निविदाधारकांची तांत्रिक लिफाफा निविदेसाठी पात्र आहे त्यांच्या आर्थिक गुणांची गणना खालीलप्रमाणे केली जाईल:

$$\text{आर्थिक निविदाधारकाचे गुण निविदा (Y)} = १०० \text{ X } \frac{\text{निविदेसाठी निविदाधारकाने नमूद केलेली सर्वात कमी किंमत (रु.)}}{\text{निविदेसाठी संबंधित निविदाधारकाने नमूद केलेली किंमत (रु.)}}$$

वरीलप्रमाणे सुरक्षित केलेले गुण हे निविदेसाठी (Y) व्यापारी लिफाफ्याचे आर्थिक गुणांकन असेल.

**C. निविदाधारकांचे संमिश्र गुणांकण खालीलप्रमाणे तयार केले जातील:**

| **निविदाधारक** | **तांत्रिक गुणांकन (X)** | **आर्थिक गुणांकन (Y)** | **भारीत तांत्रिक गुणांकन (X च्या ८०%)** | **भारीत आर्थिक गुणांकन (Y च्या २०%)** | **एकत्रीत गुणांकन F=D+E** |
|---|---|---|---|---|---|
| **A** | **B** | **C** | **D** | **E** | **F** |
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

**अंतिम निविदा:-**

१. उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार निविदेसाठी गठीत केलेली समिती तांत्रिक लिफाफा व व्यापारी लिफाफा यांचे मुल्यांकन करून सर्वाधीक एकत्रीत गुणांकन (**F=D+E**) प्राप्त होणाऱ्या निविदा धारकाचा शिफारशीसह अहवाल मा. महासंचालक बार्टी यांना सादर करेल.

२. निविदा मुल्यमापन समितीने निवडलेल्या निविदा धारकास (प्रशिक्षण संस्था) आवश्यकता असल्यास पुढील कार्यवाही करण्या करीता आमंत्रीत करेल.

३. मा. महासंचालक बार्टी एक किंवा अधिक पात्र निविदाधारकांना प्रशिक्षण देणेसाठी समाविष्ट (empanel) करू शकतात किंवा निविदा मुल्यमापन समितीच्या शिफारशीच्या आधारे सर्व किंवा कोणत्याही निविदाधारकाला प्रक्रियेमधून रद्द करू शकतात.

४. मा. महासंचालक बार्टी यांनी घेतलेले निर्णय अंतिम असतील व सर्व निविदा धारकांना बंधनकारक असेल.

**ई) आर्थिक बाबी :-**

**१)** निविदा धारकाने सादर केलेल्या प्रति विद्यार्थी प्रशिक्षण दर या प्रमाणे सहा महिन्याच्या कालावधीसाठी १५० विद्यार्थ्यांच्या एका बॅचसाठी एकुण प्रशिक्षण शुल्क व कर संस्थेस देय राहील.

**२)** परिस्थितीनुसार योग्य त्या नवीन अटी करारनाम्यामध्ये समाविष्ट करणे अथवा आवश्यक ते बदल करण्याचा संपूर्ण अधिकार महासंचालक बार्टी यांना राहिल.

**३)** अर्ज आणि त्याबाबतच्या अटी व नियम यांचा अर्थ लावण्याचा संपूर्ण अधिकार या कार्यालयास राहील आणि महासंचालक, बार्टी, पुणे यांचा निर्णय अंतिम राहील.

**४)** निविदे विषयी वाद निर्माण झाल्यास त्याबाबतचा दावा पुणे न्यायालयात करणे बंधनकारक राहिल.

**५)** निविदा अंतिम करणे, पुढे ढकलणे अथवा रद्द करणे याबाबतचे संपुर्ण अधिकार महासंचालक, बार्टी, पुणे यांना राहिल.

**६)** बॅच मधील उपस्थित प्रशिक्षणार्थी यांचे उपस्थिती नुसार प्रति प्रशिक्षणार्थी निविदेमध्ये सादर केलेले दर या प्रमाणे उपस्थित प्रशिक्षणार्थी निहाय प्रशिक्षण शुल्क अदा केले जाईल.

**७)** निविदे सोबत विषय निहाय महिना निहाय अभ्यासाचे वेळापत्रक सादर करणे आवश्यक आहे. (कमीत कमी ६०० तासाचे नियोजन आवश्यक आहे.)

८) प्रशिक्षण संस्थाची निवड करताना गुणवत्तापूर्वक प्रशिक्षण, पारदर्शकता आणि समान हित या मूल्यांच्या आधारे संस्थाना प्राधान्य देण्यात येईल.

९) दिनांक ०१/१२/२०१६ च्या शासन निणयान्वये दंडाची रक्कम १० टक्के वसुल करण्याचा अधिकार मा. महासंचालक, बार्टी, पुणे यांना असेल.

**निबंधक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

**(To be submitted on Bidder letter-head)**

**निविदा फॉर्म- प्रपत्र अ**

**मांग मातंग, मिनिमादिग, दखनी-मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग-गारोडी, मांग-गारुडी या घटकांकरिता बँक (IBPS), रेल्वे व एल.आय.सी. व तत्सम इत्यादी पदांच्या स्पर्धा परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी महाराष्ट्र राज्यातील अमरावती, महाराष्ट्र ठिकाणी निवासी प्रशिक्षण देण्याकरीता प्रशिक्षण संस्थांची निवड (Empanelment) करण्याकरीता अर्ज**

**जिल्ह्याचे नाव :- ___________________________________**

| **अ.क्र** | **विषय** | **माहिती** |
|---|---|---|
| १ | निविदा भरणाऱ्या संस्थेचे संपूर्ण नाव | |
| २ | निविदा भरणाऱ्या संस्थेचे संपूर्ण पत्ता | |
| ३ | दूरध्वनी क्रमांक | |
| ४ | मोबाईल क्रमांक | |
| ५ | ई-मेल आय डी | |
| ६ | सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० नुसार संस्थेचा नोंदणी क्रमांक, प्रमाणपत्रासह | |
| ७ | संस्थेने मागील एक वर्षाचे आयकर भरला आहे काय? असल्यास त्याबाबतचे आयकर विवरणपत्र सादर करावेत. | |
| ८ | संस्थेचे बँक खाते तपशील व पत्ता | |
| ९ | संस्थेचे खाते असलेल्या बँकेचे नाव व पत्ता संस्थेने बँकांमध्ये काढलेल्या खात्यांचा प्रकार व त्यांचे क्रमांक (पासबुकाची / किमान सहा महिन्याच्या व्यवहाराची झेरॉक्स किंवा सहा महिन्यांचे स्टेटमेट जोडणे आवश्यक) (एका पेक्षा जास्त बँकात खाती असल्यास त्यांचाही तपशील द्यावा.) | |
| १० | मागील ३ वर्षाचा लेखापरीक्षणाचा अहवाल (Audit Report) जोडावा. | |
| ११ | संस्थेचे पॅन/टॅन क्रमांक | |
| १२ | संस्थेचे वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक | |
| १३ | संस्थेने बँकांकडुन कर्ज घेतले असल्यास त्या बँकांची नावे व कर्जाची रक्कम व कर्ज काढण्याचे कारण नमूद करावे. | |
| १४ | संस्थेच्या नावाचे रु.५,००,०००/- (रक्कम रु. पाच लाख) एवढ्या रक्कमेचे राष्ट्रीकृत बँकचे नजीकच्या कालावधीचे हैसियत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. (Bank Solvency Certificate) | |
| १५ | अर्जासोबत विहित हमीपत्र सोबत जोडावे. (हमीपत्र नमुना परिशिष्ट ब जोडला आहे) | |
| १६ | स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण कार्यक्रम राबविलेल्या किंवा इतर तत्सम बँक (IBPS), रेल्वे, एल.आय.सी. व इतर तत्सम स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाच्या कामाचा ३ वर्ष पूर्व अनुभव असणे आवश्यक आहे. याबाबतची माहिती पुराव्यासह निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे. | |
| १७ | निविदा भरणाऱ्या संस्थाना कमीत कमी ३ वर्षाचा स्पर्धा परीक्षेच्या कोंचिग बाबतचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी दिलेल्या स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणाच्या आधारे | |

| | | |
|---|---|---|
| | नोकरीच्या संधी प्राप्त करुन दिल्याबाबतची माहिती सबळ पुराव्यासह निविदे सोबत परिशिष्ट ब सादर करणे बंधनकारक राहिल. त्याप्रमाणे तपशील द्यावा. | |
| १८ | संस्थेमधील तज्ञ व्यक्तींची (Resource Person) संख्या व त्यांची नावे (त्यांचा बायोडेटा सोबत जोडलेल्या परिशिष्ट क नुसार जोडणे आवश्यक आहे. | |
| १९ | अशा प्रकारच्या प्रशिक्षणाकरीता इतर ठिकाणी भाग घेतला असल्यास त्यासंबंधीची माहिती द्यावी. | |
| २० | प्रशिक्षण केंद्र जिल्हयाच्या ज्या शहरात/ मुख्यालयाच्या ठिकाणी सुरु करणार आहे त्या ठिकाणाचे नाव, पत्ता व प्रशिक्षण केद्रांचा संपूर्ण पत्ता द्यावा. | |
| २१ | इमारत भाड्याची आहे की, स्वत:ची (स्वत:ची असल्यास पुरावे जोडावे / भाड्याची असल्यास नोदणीकृत भाडेकरारनामा जोडावा.) | |
| २२ | इमारतीमध्ये असलेल्या खोल्यांची संख्या व त्यांचे अंदाजे क्षेत्रफळ, इमारतीचा मंजुर नकाशा सोबत जोडावा. (कमीत-कमी १५०० चौ. फुट जागा असणे आवश्यक आहे.) | |
| २३ | वसतिगृह इमारतीमध्ये असलेल्या खोल्यांची संख्या व त्यांचे अंदाजे क्षेत्रफळ, इमारतीचा मंजुर नकाशा सोबत जोडावा. | |
| २४ | इमारतीमध्ये पुरेशी दारे, खिडक्या, विद्युत व्यवस्था, पंखे, फळा, खुर्च्या, टेबल इ. साहित्य सुस्थितीत आहे काय? (बाबनिहाय माहिती द्यावी) तसेच प्रशिक्षण इमारतीची देखभाल व दुरुस्ती खर्च प्रशिक्षण संस्थेने करण्याबाबत हमीपत्र जोडणे आवश्यक आहे. | |
| २५ | महिला व पुरुषांकरीता स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय आहे काय? (बाबनिहाय माहिती द्यावी) | |
| २६ | ग्रंथालयाची सुविधा आहे काय? | |
| २७ | ग्रंथालयातील पुस्तकांची, व सराव प्रश्नसंच यादी,मासिके, वर्तमान पत्रे यांची संख्या नमुद करावी. | |
| २८ | इमारतीमध्ये स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय आहे काय? (तपशीलवार माहिती द्यावी) | |
| २९ | प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षकांव्यक्तिरिक्त अन्य कर्मचाऱ्यांची संख्या (त्यांची नावे व पदनामे सोबत स्वतंत्रपणे देणे आवश्यक) | |
| ३० | प्रशिक्षण केंद्रामध्ये दूरदर्शन संच, संगणक, प्रोजेक्टर, झेरॉक्स, दृकश्राव्य माध्यमे इ. सुविधा बाबतची माहिती द्यावी. | |
| ३१ | सध्या कोणत्या अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण वर्ग सुरू आहेत त्यांची माहिती (त्याची यादी सोबत जोडणे आवश्यक आहे.) | |
| ३२ | संस्थेचे / फर्मचे नाव काळ्या यादीत नाही. तसेच संबंधीत संस्थेच्या कोणत्याही नातेवाईकांस काम देण्यात येणार नाही. याबाबतचे हमीपत्र जोडावे. | |
| ३३ | मार्गदर्शन केंद्राचे छायाचित्रे (Photographs) (सोबत जोडणे आवश्यक आहे.) | |
| ३४ | सराव व गुणवत्तेबाबत चाचणी परीक्षा तपशीलवार माहिती. | |

| | | |
|---|---|---|
| | निविदे सोबत विषय निहाय महिना निहाय अभ्यासाचे वेळापत्रक सादर करणे आवश्यक आहे. (कमीत कमी ६०० तासाचे नियोजन आवश्यक आहे.) | |
| ३५ | निविदेतील मुद्दा क्र.८ व मुद्द्दा क्र.९ (ड) नुसार सर्व आवश्यक कागदपत्रे जोडली आहेत का? (होय/ नाही)<br>टीप:- निविदा धारकाने सर्व आवश्यक कागदपत्रे प्रपत्र-अ सोबत जोडणे आवश्यक आहे. | |
| ३६ | इतर कागदपत्रे | |

**स्थळ:-** **अर्जदाराचे नाव:-**

**दिनांक:-** **संस्थेचे नाव व शिक्का:-**

**परिशिष्ट ब**

**(सदरचे हमीपत्र रु. १०० च्या मुद्रांक शुल्कावर नोटरी केलेले असावे.)**

**हमीपत्र**

मी श्री/ श्रीमती.......................................................................... हुद्दा (संस्थेतील पद नमुद करावे)............................................... असे हमीपत्र लिहुन देतो/देते की, या अर्जात नमुद करण्यात आलेली सर्व माहिती व निविदेसोबत जोडलेली सर्व अनुषंगीक कागदपत्रे बरोबर असुन ती खरी आहेत. तसेच अर्जासोबत जोडलेल्या अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. सादर करण्यात आलेली माहिती अथवा कागदपत्रे खोटी/चुकीची/दिशाभुल करणारी आढळुन आल्यास कायदेशीर कारवाई होण्यास मी/संस्था पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

**दिनांक:-**

**वेळ:-**

**ठिकाण:-**

**अर्जदाराची सही**

**नाव:- श्री/श्रीमती**

**पत्ता:-**

**संस्थेचे नाव/शिक्का:-**

## परिशिष्ट क (१)

**प्रशिक्षण संस्था तपशील**

| अ.क्र | प्रशिक्षण संस्थेचे नाव | संस्थेचा अनुभव कालावधी | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|
| | | | |

**परिशिष्ट क (२)**

**प्रशिक्षक तपशील**

| अ.क्र | प्रशिक्षकांचे नाव | मोबाईल क्रमांक | शिक्षण | विषय | अनुभव कालावधी | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

## परिशिष्ट ड

**विद्यार्थी तपशील**

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | मोबाईल क्रमांक | उत्तीर्ण परीक्षा नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | यश संपादन केलेले पद | पुरावा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

# व्यापारी लिफाफा प्रपत्र “इ”

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Tender Inviting Authority: Director General Dr Babasaheb Ambedkar Research and Training Institute BARTI Pune** | | | | | | | | |
| **Name of Work: Selection of Training Institute for IBPS Training of Dr. Babasaheb Ambedkar Research and Training Institute** | | | | | | | | |
| **Contract No:** | | | | | | | | |
| **Name of the Bidder/ Bidding Firm / Company :** | | | | | | | | |
| **PRICE SCHEDULE**<br>**Bidder Name and Values only)** | | | | | | | | |
| **NUMBER #** | **TEXT #** | **NUMBER #** | **TEXT #** | **NUMBER** | **NUMBER #** | **NUMBER #** | **NUMBER #** | **TEXT #** |
| **Sl. No.** | **Item Description** | **Quantity of students** | **Units** | **Estimated Charge Rate (per student for A sesion)** | **Charge Rate Per student** | **TOTAL AMOUNT Without Taxes** | **TOTAL AMOUNT With Taxes** | **TOTAL AMOUNT In Words** |
| **1** | **2** | **4** | **5** | **6** | **13** | **53** | **54** | **55** |
| 1 | **IBPS Tender** | | | | | | | |
| 1.01 | Coaching Fees for IBPS Residential Training institute per student | 150 | Nos | | | **0.000** | **0.000** | INR Zero Only |
| **Total in Figures** | | | | | | **0.000** | **0.000** | INR Zero Only |
| **Quoted Rate in Words** | | **INR Zero Only** | | | | | | |

***टीप: निविदाधारकाने नमूद केलेले दर हे वस्तू आणि सेवाकर (GST) विरहित असावे.**

१. निविदे नमुद सर्व अटी व शर्ती मी, वाचलेल्या असून त्या मला मान्य आहेत. वरिल दर मी स्वत: भरलेले असून ते मला मान्य आहेत.